महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

चिपळूण नगर परिषद (जि.रत्नागिरी) हद्दीतील रॉयलनगर वसाहतीला जाणे-येणेसाठी योग्य रस्ता नसल्याबाबत

(१) ३१६५ (२३-१२-२०१४). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) हद्दीतील रॉयलनगर वसाहतीला जाणे-येणेसाठी योग्य रस्ता नसून, पाणी पुरवठा व्यवस्थित न होणे, सांडपाण्याची योग्य ती व्यवस्था नसणे आदी गैरसोईमुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार नगरपरिषद व्यवस्थापनाकडे मागणी करुनही त्याची पुर्तता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसाहतीला रस्ता, पाणी, सांडपाणी व्यवस्था सारख्या नागरी सुविधा पुरविणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केल्याप्रमाणे नगरपरिषदेकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) रॉयल नगर वसाहतीमध्ये पक्क्या स्वरुपाचा डब्ल्यूबीएम रस्ता तयार करण्यासाठीच्या रु. ५८,१०,३५८/- इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीचा प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्राप्त झाली असून निविदा मंजूरीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

तसेच पाणीपुरवठा करण्याकरिता नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असून पाणीपुरवठा देखील सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आखाडा-बाळापूर (जि.हिंगोली) येथील पोलीस ठाण्याची नवीन इमारत व पोलीस कर्मचारी निवासस्थानाचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(२) ५६१३ (०६-०७-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा-बाळापूर (जि.हिंगोली) येथील पोलीस ठाण्याची नवीन इमारत व पोलीस कर्मचारी निवासस्थानाचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) व (२) हिंगोली जिल्ह्याअंतर्गत पोलीस स्टेशन आखाडा-बाळापूर येथील पोलीस ठाण्याची इमारत व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नवीन निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव सुधारीत दरसूचीप्रमाणे मागविण्यात आला आहे. सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अंधेरी येथील कूपर आणि कामगार हॉस्पिटलमधून टीबीच्या रुग्णांना पूर्णक्षमतेने उपचार मिळत नसल्याबाबत

(३) ६०७५ (०६-०४-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी येथील कूपर आणि कामगार हॉस्पिटलमधून टीबीच्या रुग्णांना पूर्णक्षमतेने उपचार मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर दोन्ही हॉस्पिटलमधून पूर्ण क्षमतेने उपचार मिळावेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कूपर रुग्णालयासंदर्भात हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कूपर रुग्णालयातून टी.बी. (क्षयरोग) च्या रुग्णांना पूर्ण क्षमतेने उपचार मिळण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

अंधेरी येथील कामगार रुग्णालय राज्य शासनाच्या अखत्यारीत नसून ते केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारीत असून, त्यावर राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांचे नियंत्रण आहे.

याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागाने आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांना दिल्या आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण नगरपरिषदेतर्फे राबविलेल्या स्वच्छ अभियान
मोहिमेतील कामगारांना वेतन मिळणेबाबत

(४) ६१९२ (०८-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषदेतर्फे (जि.रत्नागिरी) स्वच्छ अभियान ही मोहीम राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोहीमेत ठेकेदारी पध्दतीने ३० कामगार घेण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना ३ महिने पगार न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामगारांना पगार देण्यास टाळाटाळ करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) होय.

(२) शहर स्वच्छ मोहिमेकरीता २० कामगार ३० दिवसांकरिता कत्राटी पध्दतीने घेण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

सदर कामाचे देयक कंत्राटदाराने दि. १५/१२/२०१४ रोजी नगरपरिषदेकडे सादर केले होते. त्यानुसार नगरपरिषदेने दि. १२/१/२०१५ रोजी धनादेशाव्दारे कंत्राटदारास रक्कम अदा केली आहे.

(४) नगरपरिषदेकडून कामाचे देयक वेळेत अदा करण्यात आले आहे. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बेस्टच्या अंगिकृत परिवहन उपक्रमाला (बेस्ट)
शासनाने आर्थिक सहाय मिळण्याबाबत

(५) ६४३१ (०६-०७-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सव्वा कोटी मुंबईकरांची धमणी समजली जाणाऱ्या बेस्टच्या अंगिकृत परिवहन उपक्रमाला (बेस्ट) शासनाचे आर्थिक सहाय मिळावे याकरिता लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात व त्या सुमारास एका पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी बेस्ट प्रशासनाकडून मागविण्यात आलेला अहवाल नुकताच प्राप्त झाला असून, याबाबत शासन स्तरावर छाननी सुरु आहे.

कोल्हापूर शहरातील रंकाळा तलावाच्या तटबंदीची दुरुस्ती करण्याबाबत

(६) ७१२५ (०७-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराचे वैभव असलेल्या ऐतिहासिक रंकाळा तलावाच्या तटबंदीला दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास तिसऱ्यादा भगदाड पडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रंकाळा तलावाची शालिनी पॅलेससमोरील सुमारे ४० फुट इतकी लांब भिंत दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोसळली हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच येत्या काही दिवसांत सुमारे हजार फुट इतक्या लांबीची तटबंदी अखंड कोसळण्याच्या स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या तटबंदीच्या दुरुस्ती संदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) व (२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) लागू नाही.

मुंबई झोपडपटयांमधील स्वछतागृहांबाबत

(७) ७५७७ (०७-०४-२०१५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपटयांमध्ये स्वच्छ, सुरक्षित सार्वजनिक स्वच्छतागृहांची उपलब्धता नसल्याने सदर वस्त्यांतील महिलांना अंधारात उघडयावर शौचास जावे लागत असल्याचे भयावह प्रकार माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सबंधित यंत्रणा अतिसंवेदनशील नसल्याचेही आढळुन आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या सुरक्षिततेसाठी सदर वास्तव्यांमध्ये स्वच्छतागृहे बांधण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्ट्यांमध्ये सार्वजनिक शौचालयांची बांध्कामे बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच म्हाडाअंतर्गत झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्यामार्फत केली जातात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयांमध्ये विद्युत व पाण्याची सुविधा दिली जाते. तसेच त्यामध्ये महिलांकरिता स्वतंत्र शौचकुपांची व्यवस्था केली जाते. लहान मुलांसाठी विशेष शौचकुपे तसेच महिला व पुरुषांकरिता प्रत्येकी १ स्नानगृहे व सुरक्षिततेच्या दृष्टीन काळजीवाहकासाठी खोली उपलब्ध करुन दिली जाते. सदर खोलीमध्ये काळजीवाहक त्यांच्या कुटुंबासमवेत २४ तास राहत असल्यामुळे सदर शौचालय स्वच्छ व सुरक्षित असतात.

आमदार / खासदार स्थानिक विकास कार्यक्रम, नागरी दलित वस्ती सुधार योजना, एम.एम.आर.डी.ए. निधी इत्यादी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्ट्यांमध्ये जागेची उपलब्धता व आवश्यकतेनुसार पुरुष व स्त्रियांसाठी स्वतंत्र शौचालये बांधली जातात. सदर शौचालये स्थानिक नोंदणीकृत संस्थेत देखभालीसाठी हस्तांतरीत केली जातात.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सावंतवाडी नगरपरिषद मुख्याधिकारी निधी गोळा करीत असल्याबाबत

(८) ८००९ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या क वर्ग नगरपरिषदेला प्रायोजक तत्वावर नगरपरिषद अधिनियम १९६५ अन्वये कोणत्याही घटकांकडून निधी गोळा करण्याचा अधिकार नसतांनाही नगरपरिषदेचे सर्व विद्यमान नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, विषय समितीचे सर्व सभापती, विद्यमान नगरसेवक, नगरपरिषदेचे शासन नियुक्त मुख्याधिकारी, कर्मचारी यांनी संगनमत करुन प्रायोजक तत्वावरच्या निधीचा गोंडस नावाखाली निधी गोळा करीत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल करावा अन्यथा सनदशीर मार्गाने अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा माजी नगरसेवक यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा माजी नगरसेवक यांनी लाचलुचपत प्रतिबंधक अधिक्षकांना निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) होय, तथापि याबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी नगरपालिकेकडून अहवाल मागितलेला होता. याप्रकरणी दोष आढळून आला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरास काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवून पाणीपुरवठा करण्याबाबचा प्रस्ताव

(९) ८५४५ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे पंचगंगा व कृष्णा नदीचे पाणी दुषित झाल्यामुळे इचलकरंजी शहरास काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवून पाणीपुरवठा करण्याबाबतचा ठराव इचलकरंजी नगरपालिकेने माहे जानेवारी २०१४ मध्ये वा त्यासुमारास संमत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्हा परिषेदतून ग्रामीण पाणी पुरवठ्यावर दरवर्षी किमान १०० कोटी रूपये खर्च केले जातात यातील ४९ टक्के रक्कम ही योजनाबाह्य गोष्टीसाठी खर्च केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील योजनेचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून मंजुरीसाठी संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय यांना सादर केला तसेच सदर प्रस्तावामधील तांत्रिक त्रुटी दूर करून योजनेच्या निधी उपलब्धतेबाबत उच्च स्तरावर बैठक बोलविण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय, हे खरे आहे काय,

(४) तसेच सदर योजनेच्या कन्स्ल्टंट असलेल्या युनिटी या कंपनीने केलेल्या कामात अनेक त्रुटी आढळून आल्याने उक्त कंपनीकडून या योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याने सदर कंपनीकडून कामे काढून घेऊन व या कंपनीला ब्लॅकलिस्ट करावे अशी मागणी प्रा.जयंत पाटील यांनी सर्वसाधारण सभेत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदरील प्रकल्पातील तांत्रिक त्रुटी दुर करून मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :(१) होय.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत जिल्हापरिषद कोल्हापूरसाठी प्राप्त होणाऱ्या निधीपैकी राज्य हिस्यामधील १५% रक्कम देखभाल व दुरुस्तीसाठी वापरली जाते व उर्वरित सर्व प्राप्त निधी पाणी पुरवठा योजनासाठी वापरला जातो.

(३) होय.

(४) युनिटी कन्सल्टन्ट प्रा.लि. पुणे यां कंपनीचे कामकाजाबाबत मा.प्रा.जयंत पाटील, नगरसेवक, कोल्हापूर महानगरपालिका यांनी सर्व साधारण सभेत प्रश्न उपस्थित केले आहेत, हे खरे आहे.

(५) सदर कंपनीच्या कामकाजातील त्रुटी दुर करुन योजनेच्या कामासाठी अनुभवी पुरेसा स्टाफ त्वरीत नेमावा अन्यथा कंपनीस काळ्या यादीत टाकण्यात येईल अशा आशयाची नोटीस कोल्हापूर महानगरपालिकेकडून सदर कंपनीस देणेत आली.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या सदर नोटीशीच्या अनुषंगाने कन्सल्टन्ट कंपनीने वरीष्ठ स्तराच्या अभियंत्यांची स्थानिक पातळीवर नेमणूक केली आहे. तसेच अन्य स्टाफ सुध्दा नेमणेत आलेला आहे.

सदर योजनेचे काम प्रगतीपथावर असून योजनेच्या कामकाजामध्ये कन्सल्टन्ट कडून ज्यावेळी पाटपुरावा कमी पडेल त्या त्या वेळी कोल्हापूर महानगरपालिकेकडून कन्सल्टन्टला समज देऊन त्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या मारेक-यांचा शोध लावण्याबाबत

(१०) १९६९६ (१२-०८-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.रवि राणा (बडनेरा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरामध्ये दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ.गोविंदराव पानसरे व त्यांच्या पत्नी यांच्या मारेक-यांचा शोध लावण्यासाठी पोलिसांनी खास पथके स्थापन करुनही पोलिसांना अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटक आणि गोवा राज्यांतील पोलिसांकडून कोणते सहकार्य घेण्यात आले आहे काय तसेच कॉम्रेड पानसरे यांच्या मारेक-यांचा शोध घेण्यासाठी मार्च, २०१५ नंतर केलेल्या तपासाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) अद्याप उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) होय, हे खरे नाही.

(२) सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान प्रा.कलबुर्गी यांची धारवाड, राज्य कर्नाटक येथे हत्या झाली. सदर दोन्ही हत्येमध्ये साम्य आहे काय या अनुषंगाने एक तपास पथक कर्नाटक राज्यामध्ये पाठवून प्रा.कलबुर्गी यांच्या हत्येबाबत माहिती घेतली. तसेच, कर्नाटक पोलीसांकडून प्रा.कलबुर्गी यांच्या हत्येच्या घटनास्थळावरील डम्प डाटा, संशयीतांची छायाचित्रे, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडील अहवाल यांची देवाण-घेवाण करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर मडगाव गोवा बॉम्बस्फोटातील आरोपींबाबत माहिती संकलीत करण्यासाठी गोवा पोलीसांकडून मदत घेण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत एका आरोपीविरुध्द दोषारोपपत्र पाठविले आहे. तसेच, तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर शहराला पाणीपुरवठा करणा-या चार मुख्य स्त्रोतांपैकी असलेल्या सायबाचे धरणाच्या विकासाबाबत

(११) २२९५६ (१७-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर शहराला पाणीपुरवठा करणा-या चार मुख्य स्त्रोतांपैकी सर्वात महत्वाचा ब्रिटिशकालीन बांधण्यात आलेले सायबाचे धरण याला जवळपास १३६ हून अधिक वर्षे लोटली असून हे धरण विकासाच्या प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची दुरवस्था झाली असल्यामुळे शहरातील पाणीटंचाई वाढून दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाच्या दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) तद् नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) होय.
(२) सदर धरणातील पाणीसाठा मार्चअखेरीस संपुष्टात येत असल्याने शिळ जॅकवेल येथून शहरास पाणीपुरवठा करण्यात येतो. सद्य:स्थितीत पंपीग मशिनरीची क्षमता कमी असल्याने तसेच जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्रादरम्यान टाकण्यात आलेली जलवाहिनी कमी क्षमतेची व A.C. असल्याने वारंवार फुटुन पाणीटंचाईत निर्माण होते. तसेच वीज पुरवठा ६ ते ८ तास खंडीत होत असल्याने कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होते. सबब पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उन्हाळ्यात दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येतो.
(३) व (४) हे खरे नाही.
सदर धरणाचे Structural Audit (संरचनात्मक परिक्षण) करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना दि. ३/३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सूचीत केले आहे.
(५) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचा अहवाल प्राप्त झल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेचा विकास आराखडा अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

(१२) २४२९६ (११-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेचा विकास आराखडा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकास आराखड्या अंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करुन पन्हाळा पर्यटन मार्गदर्शन केंद्र इमारत बांधून वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठिकाणी जंगल माहिती केंद्र, प्रतिक्षालय, व्यायामशाळा, इन डोअर गेम्स, तात्पुरते तंबू निवास, पार्कींग व्यवस्था, वन्य प्राण्यापासून संरक्षण भिंत व लॅन्ड स्केपिंग आदी सुविधासह रखडलेला पर्यटन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) हे खरे नाही. शासनाने दि.२६/०३/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेच्या विकास योजनेस भागश: क्षेत्रासाठी मंजूरी दिली असून उर्वरित वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने दि.१५/०१/२०१६ रोजीच्या अधसूिचनेन्वये मंजूर केली आहे.

(२) हे खरे आहे.

पन्हाळा पर्यटक मार्गदशन केंद्र या इमारतीचे बांधकाम केंद्र पुरस्कृत योजना आर्थिक वर्ष २००६-०७ अंतर्गत कोल्हापूर परिसराचा एकात्मिक विकास करणेसाठी केंद्र शासनाकडून सन २००६ मध्ये मंजूरी देऊन निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वर्ग करण्यात आला होता व काम जून, २०१३ मध्ये पूर्ण झालेले आहे.

पन्हाळा येथील (सि.स.नं. ६३५ (रि.स.नं.८अ) पैकी सुमारे ६५०० चौ.मी.) ही सरकारी मुलकी पड प्लॅटेशन वहिवाट फॉरेस्ट खाते यांचे नावावर असून सदर जागा महामंडळाच्या नावावर हस्तांतरीत करणेकामी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे. सदर जागा महामंडळाच्या नावे हस्तांतरीत झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) सदर बाबी पन्हाळा पर्यटक मार्गदर्शक केंद्राच्या कामामध्ये अंतर्भूत नाहीत.

(४) विकास योजना शासनाने विहित मुदतीत मंजूर केली असल्याने विलंब झालेला नाही.

पोष्टाच्या बचत खात्यातील रकमेची फसवणूक केल्याबाबत

(१३) २५१७३ (१०-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड येथे पोष्टाच्या बचत खात्यातील एक लाख ४३ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात एका विरुध्द गुन्हा दाखल झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नोंदविलेल्या गुन्ह्यानुसार शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सिल्लोड शहर येथे पोस्टाच्या बचत खात्यातील रु.१,४५,८९०/- एवढ्या रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी गु.र.क्र. ६४/२०१५, भा.दं.वि. कलम ४२०, ४०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आलेली नाही. गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी तसेच रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर शेकडो संशयास्पद पिंप आढळून आल्याबाबत

(१४) २८४६८ (२१-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, दापोली तसेच रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास शेकडो संशयास्पद पिंप आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारी पाण्यातून वाहून आलेले एकूण ६० पिंप/बॅरल्स व रत्नागिरी जिल्ह्यात एकूण ३४ पिंप/बॅरल्स आढळून आले होते.

(२) सदरचे पिंप/बॅरल्सचे अनुषंगाने चौकशी करता ते एम.व्ही.कॉस मॉस या जहाजावरुन पडूत वाहत आल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर पिंपतील द्रव्यपदर्थ नमुन्याकरिता काढून सी.ए.लॅब कलिना, मुंबई यांचेकडे परिक्षणासाठी पाठविले असता सदर पिंपात पेट्रालियम हायड्रोकार्बन असल्याचे अभिप्राय दिले आहते. त्यानुषंगाने अधिक चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिरपूर(जि.धुळे) येथे वाळू माफियांवर गुन्हा दाखल करण्यास पोलिस निरिक्षकांनी टाळाटाळ केल्याबाबत

(१५) २८५८० (२१-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर (जि.धुळे) येथे वाळू माफियांना अटकाव करणा-या मंडळ अधिका-यांस दमदाटी व शिवीगाळ केल्या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यास पोलिस निरिक्षकांनी टाळाटाळ केल्याचे माहे सप्टेंबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निषेधार्थ तसेच गौण खनिज वाहतूक तपासणी पथकांत पोलिस कर्मचा-यांचा समावेश करावा अशी मागणी करीत महसूल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ करणा-या पोलिस निरिक्षकांवर कोणती कारवाई केली तसेच राज्यात यापूर्वी वाळू माफियांकडून सरकारी अधिकारी व कर्मचा-यांवर झालेले हल्ले पाहता महसूल कर्मचारी संघटनेने केलेल्या मागण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी शिरपूर शहर पोलीस स्टेशन गुरनं. २३६/१५ भादंविक ३७९, १८९, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दि. ०१/१०/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
महसूल कर्मचाऱ्यारी संघटनेने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिलेले आहे.
(३) प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात स्थानिक पोलीस निरीक्षक यांनी टाळाटाळ केलेली नसल्याने त्यांचे विरुध्द कारवाई केलेली नाही.
(४) विलंब झालेला नाही.

मोरा (ता.उरण, जि.रायगड) येथील समुद्रात डिझेलची तस्करी होत असल्याबाबत

(१६) २९२७४ (२१-०१-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मनोहर भोईर (उरण), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोरा (ता.उरण, जि.रायगड) येथील सागरी किनारपट्टीत समुद्रातच डिझेलची तस्करी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पसिरात भर समुद्रात रात्रीच्या वेळी जेएनपीटी बंदरातून येणारे जहाज, बार्ज मधून डिझेलची तस्करी केली जात असून नेव्हीच्या जहाजातून ही अशाच पध्दतीने तस्करी होत असल्याचा शक्यता पोलीसांनी व्यक्त केली असून या प्रकरणी तस्करीतील चार आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
नवी मुंबई पोलीस आयुक्तालय यांच्या अधिपत्याखालील मोरा सागरी पोलीस ठाणे येथे गुरनं. ०८/२०१५, भा.दं.वि. कलम ३७९, २८५, ३४ सह अत्यावश्क वस्तु अधिनियम, १९५५ चे अत्यावश्यक वस्तु (सुधारणा) अधिनियम, २००६ चे कलम ३, ७ व ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याप्रकरणी ६ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे. आरोपींकडून एकूण रु. २७,४१,५००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(२) सदर गुन्ह्याचे तपासात नेव्हीच्या जहाजातून ही अशाच पध्दतीने तस्करी होत असल्याबाबत आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील ५ हजार ३४७ शस्त्र परवानाधारकांची पोलिसात नोंद नसल्याबाबत

(१७) २९५८६ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ५ हजार ३४७ शस्त्र परवानाधारकांची पोलिसात नोंदच नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत सखोल चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वायंगणी-तोडवली (जि.सिंधुदुर्ग) येथील प्रस्तावित सी वर्ल्ड प्रकल्पाबाबत

(१८) २९६०३ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वायंगणी-तोडवली (जि.सिंधुदुर्ग) येथील प्रस्तावित सी वर्ल्ड प्रकल्प १३९० एकर ऐवजी ३५० एकर जागेत उभारण्याचे पर्यटन विकास महामंडळाला मा.मुख्यमंत्री यांनी निर्देश दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी क्षेत्रात उभारला जाणारा प्रकल्प जागतिक स्तरावरील पर्यटकांना आकर्षित करण्यामध्ये यशस्वी होण्याबाबत निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणीचा शासनाने विचार केला आहे काय,
(३) असल्यास, पूर्वीच्या सी वर्ल्ड आराखड्यात बदल करुन नव्याने ३०० एकर क्षेत्रात सी वर्ल्ड प्रकल्प राबविताना शासनाने कोणकोणते बदल केले आहेत तसेच प्रस्तावित सी वर्ल्ड प्रकल्पांच्या उभारणीच्या कामास सुरुवात करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) मा.मुख्यमंत्री यांनी दि.२८/१/२०१५ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाबाबत झालेल्या बैटकीत समुद्र विश्व प्रकल्प हा प्रथम: ३५० ते ४०० एकर जागेमध्ये करण्यात यावा असे निर्देश दिले आहेत.

(२) सी-वर्ल्ड प्रकल्प जागामध्ये इतरत्र २०० ते ३०० एकर एवढ्या कमी क्षेत्रात उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये योग्य प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे त्याच धर्तीवर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

(३) प्रकल्पासाठी २९३ एकर व इतर मूलभूत सुविधांसाठी १२४ एकर जमीन प्रस्तावित केली आहे. त्यानुसार भूसंपादनाबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर येथे पासपोर्ट कार्यालय स्थापन करण्याबाबत

(१९) २९७०४ (२१-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील नागरिकांना पासपोर्ट (पारपत्र) काढण्यासाठी नागपूर येथील पारपत्र कार्यालयात जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तर महाराष्ट्रासाठी नाशिक, पश्चिम महाराष्ट्रासाठी पुणे तर मराठवाडा व विदर्भासाठी नागपूर येथे कार्यालय असून मराठवाडयातील नागरिकांना अंदाजे ५०० कि.मी. अंतरावरील पासपोर्ट कार्यालयात जाणे गैरसोयीचे होत असल्याने मराठवाडयातील नागरिकांसाठी लातूर येथे पासपोर्ट कार्यालय स्थापन करण्याची मागणी गत अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने लातूर येथे पासपोर्ट कार्यालयाची प्रलंबित मागणी पूर्ण करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१६) :(१) होय.

(२) प्रस्तुत मागणीच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे निवदन अथवा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झाल्याचे दिसून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा नांदा (ता.कोरपना, जि.चंद्रपुर) येथील डॉ. जोगी व त्यांच्या पत्नीची अज्ञात इसमांनी हत्या केल्याबाबत

(२०) ३०१८१ (२१-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यात गडचांदूर जवळच असलेल्या नांदा येथे राष्ट्रधर्म प्रचार कार्य, अंधश्रध्दा व व्यसनमुक्तीवर प्रखरपणे भाष्य करणारे डॉ.जोगी व त्यांच्या पत्नीची माहे ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास अज्ञात इसमांनी हत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरपना तालुक्यातील महिनाभरातील दुसरी घटना असतांना सदर प्रकरणाचा तपास मंद गतीने होत असल्याने आरोपी अद्यापही मोकळे असून त्यांच्या तपासात पोलीस प्रशासनाकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीत करण्यात आली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन गडचांदुर अप.क्र.६७/१५ भा.दं.वि. कलम ४६०, ३०२ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला असून गुन्ह्याचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, गडचांदूर हे करीत आहेत. गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याबाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नवीन ५९ पोलीस ठाणी निर्माण करण्याच्या प्रस्तावाबाबत

(२१) ३०३७२ (२१-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी विविध जिल्ह्यांमध्ये नवीन ५९ पोलीस ठाणी निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांनी तयार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) नाही, हे खरे नाही.
(२) राज्य पोलीस दलामध्ये पाच टप्प्यामध्ये एकूण ६१४९४ पदे व १२२ पोलीस ठाणी निर्माण करण्याचा तत्वच: निर्णय घेण्यात आला आहे. त्यातंर्गत पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये राज्य पोलीस दलामध्ये विविध संवर्गातील १२०४३ पदे व ६३ पोलीस ठाणी निर्माण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २९.९.२०१५ चे पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असून त्यामध्ये राज्य पोलीस दलामध्ये १२५४९ पदे व २९ पोलीस ठाणी नव्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कराड महानगरपालिकेस महाराष्ट्र सुवर्ण जयंती अभियान योजनेअंतर्गत भुयारी योजना राबविण्यासाठी अनुदान देण्याबाबत

(२२) ३०५९७ (२१-०१-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड शहर व नव्याने समाविष्ट झालेल्या कराड नगरपरिषेत समाविष्ट झालेल्या नगरपरिषेच्या हद्दीत राबविण्यात येणाऱ्या भुयारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती अभियान योजनेअंतर्गत अनुदान देण्याची मागणी मा.नगरविकास मंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) असे निवेदन शासनास प्राप्त झाले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील संगमवाडी ते विश्रांतवाडी या बीआरटी मार्गावरील थांब्यांच्या दुरुस्तीच्या खर्चाला स्थायी समितीची परवानगी न घेतल्याबाबत

(२३) ३१०५४ (२१-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील संगमवाडी ते विश्रांतवाडी या बीआरटी मार्गावरील थांब्यांच्या दुरुस्तीवर १ कोटी ८९ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला असला तरी या खर्चाला स्थायी समिती वा महापालिकेची कोणतीही परवानगी न घेताच हा खर्च केला असल्याची वस्तुस्थिती माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये उघड झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यामधील दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) पुणे शहरातील संगमवाडी ते विश्रांतवाडी या आंळदी रोडवरील व येरवडा पर्णकुटी चौक ते जुना खराडी जकातनाका या नगररोड वरील एकूण १६ कि.मी. लाबीच्या बीआरटीएस मार्गावरील बसथांबे, त्यांची मार्गिका रेलिंग बसथांब्यांचे स्वयंचलित दरवाजे यांचे झालेल्या नुकसानीचे / तोडफोडीची दुरुस्तीचे कामे करणेत आली आहेत व करणेत येत आहे. याकरिता रुपये १.८९ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त एकूण १६ कि.मी. लांबीच्या बीआरटीएसम मार्गावरील बसथांबे व अनुषंगिक दुरुस्तीची कामे ही कामाची तातडी लक्षात घेवून नव्याने निविदा न मागिविता बीआरटीएस कामाचे मुळ ठेकेदारांकडूनच बचतीच्या रक्कमेमधून निविदा अटी व शर्तीनुसार करुन घेण्यात आलेली आहे सदर कामी नव्याने निविदा मागविण्यात आलेली नसल्याने स्थायी समितीची मान्यता आवश्यक नव्हती. परंतु सदर दुरुस्तीची कामे करण्यास व त्या प्रित्यर्थ होणाऱ्या खर्चास महापालिका आयुक्त ठराव ६/६७, दिनांक ४.६.२०१५ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

चेंबूर येथील खारदेव नगर मधील वैभवनगर परीसरातील वाहणारा नाला दुरुस्तीबाबत

(२४) ३२८०३ (२१-०१-२०१६). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर येथील खारदेव नगर मधील वैभवनगर परीसरातील वाहणारा नाला वेड्यावाकड्या पध्दतीने अनेक ठिकाणी वळविण्यात आल्याने व परिसरातील भाग्यवान सोसायटीजवळून हा नाला वाहत असल्याने इमारतीला धोका निर्माण झाल्याचे व वर्ष भर नाला तुडुंब भरुन रस्त्यावर गटाराचे पाणी येत असल्याने सध्या परीसरातील झोपटपट्टी एम.आर.ए. प्रकल्पाअंतर्गत विकसित करत असताना सदर नाला सरळ करणे शक्य असल्यांने याबाबत निर्णय घेऊन परिसरातील नागरीकांना न्याय न दिला गेल्यास परिसरातील नागरीकांनी तीव्र आंदोलन केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर नागरीकांबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

चेंबूर येथील खारदेव नगर मधील वैभवनगर परिसरातील नाल्याच्या रुंदीकरणाचे व बांधकामाचे काम, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असून सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मालाड पश्चिमेतील पालिकेच्या रुग्णालयाची झालेली दुरवस्थेबाबत

(२५) ३२८३४ (२१-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवासियांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी मुंबई महानगरपालिका आपल्या अखत्यारीतील विविध ठिकाणच्या रुग्णालयांना सुखसुविधा देण्यासाठी कोटयावधी रुपये खर्च करते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाड पश्चिमेतील महानगरपालिकेच्या रुग्णालयाची दुरावस्था झाली असून त्याच्या स्थितीत सुधारणा व्हावी अशा अनेक लेखी तक्रारी सामाजिक कार्यकर्त्यांनी माहनगरपालिका उत्तर विभाग कार्यालयात व महानगरपालिका सहाय्यक आयुक्त यांचेकडे केल्या असल्याने दि. १४/१०/२०१५ व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेचे रुग्णालयातील व परिसरातील अस्वच्छतेमुळे नागरीक त्रस्त आहेत, याबाबत शासनाने कोणती कारवाई व उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दिंडोशी (मुंबई उपनगर जिल्हा) पोलीस ठाण्यामार्फत पत्रकार दाम्पत्याला पोलिसांनी मारझोड करून नंतर अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याबाबत

(२६) ३३३३४ (२१-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई स्थित नजमा सिद्धिकी व त्यांचे पत्रकार पती राज रावत यांना दिंडोशी (मुंबई उपनगर जिल्हा) पोलीस ठाण्यामार्फत दिनांक ९ ऑक्टोंबर २०१५ रोजी वा त्या सुमारास एका प्रकरणात कोणतीही शहानिशा न करता मारपीट करून सदर दाम्पत्याची लुटमार केल्याच्या घटनेबाबतची मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री (मुंबई पश्चिम उपनगर जिल्हा), जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर जिल्हा), आयुक्त (बृहन्मुंबई पोलीस दल), अप्पर आयुक्त (बृहन्मुंबई पोलीस दल पश्चिम उपनगरे), संबंधित पोलीस उपायुक्त यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) दि. ८.१०.२०१५ रोजी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करुन त्यांच्या खिशातील रक्कम काढून घेतल्याची घटना घडली आहे. सदर प्रकरणी दिंडोशी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि क्र. ५६८/१५ कलम ३९४, ४२७, ३४ भा.दं. वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आली असून आरोपी न्यायालयाच्या आदेशानुसार जामिनावर मुक्त आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.क्षेत्र सिध्दटेक (जि.अहमदनगर) येथे अवैध धंदे मोठया प्रमाणात होत असल्याबाबत

(२७) ३३४२७ (२१-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.क्षेत्र सिध्दटेक (जि.अहमदनगर) येथे अवैध धंदे मोठया प्रमाणात होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरातून या ठिकाणी श्रध्देने येणा-या भाविकांच्या सुरक्षेसाठी आणि या क्षेत्राचे पावित्र्य टिकविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) श्री क्षेत्र सिध्दटेक या ठिकाणी भाविकांचे सुरक्षेसाठी व या क्षेत्राचे पावित्र्य टिकवण्यासाठी नियमित पोलीसांची गस्त व पेट्रोलिंग या भागात चालु असते. तसेच पंधरवाडा चतुर्थीमध्ये जास्तीचा बंदोबस्त नमूद तिर्थक्षेत्राचे ठिकाणी नेमण्यात येतो. त्या माध्यमातून भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही या साठी भाविकांची दर्शनाच्या रांगा लावणे, वाहने व्यवस्थीत पार्किग करुन घेणे, लाईटची व्यवस्था करणे इत्यादी व्यवस्था मंदिर प्रशासनाच्या वतीने करुन घेणे या बाबतची कारवाई प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेली आहे.
(३) निरंक.

मुंबईतील मालाड (पूर्व) इंदिर नगर येथे कायमस्वरुपी बीट पोलीस चौकी उभारणेबाबत

(२८) ३३६३९ (२२-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील मालाड (पूर्व), पिंपरी पाडा, इंदिरा नगर, पटेल नगर, संजय नगर आदी दाट लोकवस्ती असलेल्या भागात स्थानिक रहिवाशांच्या सुरक्षतेसाठी व गुन्हेगारी कारवायांना रोखण्यासाठी इंदिरा नगर येथे कायमस्वरुपी बीट पोलीस चौकी उभारणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.गृह राज्यमंत्री महोदयांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक जनतेच्या स्वाक्षरीसह दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कुरार पोलीस ठाणे कडून मुंबई यांनी दि. ११.९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगरपालिकेला संजय नगर येथील रामलिला मैदानातील पश्चिमेकडील जागा व त्यावर बांधकाम करण्याबाबत परवानगी मागीतली आहे. तथापि, मुंबई महानगरपालिकेडून सदरहू परवानगी अद्याप न मिळाल्यामुळे बीट चौकीचे बांधकाम करण्यात आलेले नाही.

उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील ४८ पोलीस निवासस्थाने BOT तत्वावर विकसित करणेबाबत

(२९) ३३७९८ (२१-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा येथील ४८ पोलीस निवासस्थाने बांधा, वापरा, हस्तांतरीत करा BOT तत्वावर विकसित करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, पोलीस अधिक्षक, उस्मानाबाद यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.

(२) BOT तत्वाची कार्यप्रणाली व व्याप्ती पाहता उमरगा येथील ४८ पोलीस निवासस्थाने बांधा, वापरा, हस्तांतरीत BOT तत्वावर विकसित न करता सदरची निवासस्थाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सावदा (जि.जळगांव) पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले सहायक फौजदार यांनी आत्महत्या करण्याचा इशारा दिल्याबाबत

(३०) ३५८६३ (२१-०१-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा (जि.जळगांव) पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले सहायक फौजदार शेख शकील शेख दगू यांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची कैफियत मांडून तसेच वरिष्ठांच्या जाचामुळे कंटाळून आत्महत्या करण्याचा इशारा जिल्हा पोलिस अधिक्षक व विशेष पोलिस महानिरिक्षकांकडे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या सुमारास दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) होय.

(२) होय.

प्रश्नात नमूद स.फौ.यांना सावदा पोलीस स्टेशन हद्दीतील चिनावल बिट येथे नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या कामकाजाच्या पध्दतीबाबत नागरीकांनी नाराजी व्यक्ती केली होती ते जनतेशी आरेरावीची भाषा करुन मोठमोठ्याने ओरडून धमकी देतात तसेच गावातील तंटामुक्ती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठीत नागीरक यांच्याशी उर्मटपने वागतात. याबाबत सदर स.फौ. यांचे विरुध्द ग्रामस्थांनी पोलीस स्टेशनला तक्रार अर्जही दिला होता. त्यांचे बाबत काही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ पये तसेच पोलीस दलालची बदनामी होवू नये म्हणून त्यांना चिनावल बीट मधून काढून जनरल ड्युटी दिली होती. त्यांच्या गैरवर्तनाबाबत त्यांचेवर विरष्ठांकडून काही कार्यवाही होवू नये म्हणून त्यांनी सदरचा तक्रार अर्ज दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानविज, येथील प्रशासकीय व निवासी बांधकाम दुरुस्त करण्याबाबत

(३१) ३६६१५ (२१-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ७ व क्र. ५, प्रशिक्षण केंद्र नानविज,येथील नादुरुस्त झालेले प्रशासकीय व निवासी बांधकामाची दुरुस्ती करणे व नवीन बांधकामास मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना ऑक्टोबर, २०१५ वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास. सदर नादुरुस्त इमारतींची दुरुस्ती करणे व नवीन बांधकामास मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ व ७, दौंड येथील निवासी इमारतीची दुरुस्तीसाठी रुपये ४१.५३ कोटी, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज, दौंड येथील निवासी व कार्यालयीन इमारतींच्या दुरुस्तीसाठी ७.१६ कोटी आणि ९.६९ कोटी इतक्या दुरुस्तीच्या कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) शहरातील कल्याण रोड येथील शांतीनगर महिला पोलीस ठाण्याची नविन इमारतीबाबत

(३२) ३६९९७ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील कल्याण रोड येथील शांतीनगर महिला पोलीस ठाण्याची नविन इमारत सन २००५ मध्ये बांधून तयार झाल्यानंतरही महिला कोठडी तहसिल कार्यालयाच्या आवारातील सब जेलमध्ये स्थलांतरित करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शांतीनगर महिला पोलीस ठाण्याची नविन इमारत बांधून १० वर्षे पूर्ण होऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वर्ग झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तहसिल कार्यालयाच्या आवारात वाहने पार्किंगसाठी जागा नसणे, जप्त केलेली वाहने, मुद्देमाल ठेवण्यास जागा उपलब्ध नसल्याने ती वाहने फुटपाथवर किंवा रस्त्याच्याकडेला ठेवावी लागत असणे, पोलीस ठाण्यास मैदान उपलब्ध नसल्याने साप्ताहिक परेड घेता येत नसणे यासारख्या अनेक समस्या निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) भिवंडी शहरात कल्याणरोड येथे शांतीनगर पोलीस स्टेशन असून पोलीस ठाण्यामध्ये महिला पोलीस कोठडी किंवा लॉकअप रुम नसुन पोलीस ठाण्यातील महिला/पुरूष आरोपी हे सबजेल भिवंडी येथे ठेवण्यात येतात. तसेच सबजेल हे शांतीनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात येते.
(२) शांतीनगर पोलीस ठाण्याची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रॉपर्टी बुकमध्ये (पीआरबी) नोंद करण्यात आली आहे.
(३) व (४) शांतीनगर पोलीस ठाण्यातील जप्त केलेली वाहने तहसिल कार्यालयाच्या आवारात ठेवण्यात येत नसून पोलीस ठाण्याच्या आवारात तसेच शांतीनगर पोलीस चौकीच्या आवारात ठेवण्यात येतात.

पोलीस ठाण्यास मैदान नसल्याने परेड भादवड प्रशिक्षण केंद्राच्या मैदानावर घेण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अंधेरी साकिनाका व मालाड न्यू लिंक रोड येथील दोन इमारतींना लागलेली भिषण आग

(३३) ३७७९६ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी साकिनाका व मालाड न्यू लिंक रोड येथील दोन इमारतींना लागलेली भिषण आग विझवताना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास अग्निशमन दलाचे दोन जवान जखमी झालेले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आहे व त्यानूसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाच्या कार्यालयीन नोंदीनुसार अंधेरी, साकीनाका येथे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ आग लागल्याची नोंद आढळून आली नाही.

परंतु, दिनांक ३०.०८.२०१५ रोजी संध्याकाळी २०.५१ वाजता अंधेरी येथील मे. प्रमुख प्लाझा इमारत, कर्डीनल ग्रेशियस रोड, चकाला येथील इमारतीला आग लागली होती व त्या आगीत अग्निशमन दलाचे २ जवाने जखमी झाले होती.

तसेच, मालाडा न्यु लिंक रोड येथे मे. पाच स्प्रिंग इमारत येथे दिनांक ३०.०८.२०१५ रोजी ११.४६ वाजता आग लागली होती व सदर आगीत कोणीही जखमी झाले नाही.

(२) व (३) सदर आगीची चौकशी बृहन्मुंबई महानगपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत करण्यात आली असून, सदर चौकशीमध्ये सदोष विद्युत प्रणालीमुळे आग लागली असल्याचेआढळून आले आहे.

या प्रकरणी महापालिकेच्या अग्निशमन दलामार्फत अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तपासणी करुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ अंतर्गत संबंधितांवर नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यामध्ये शैक्षणिक संस्थेची बनावट कागदपत्रे, बनावट शिक्के बनवून फसवणूक केल्याबाबत

(३४) ३८७४५ (२१-०१-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यामध्ये शैक्षणिक संस्थेची बनावट कागदपत्रे, बनावट शिक्के बनवून फसवणूक केल्याप्रकरणी माजी शिक्षण उपसंचालक सहीत १४ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्यानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मंगळूरपीर येथे अप. क्र. २४६/१५, भा.दं.वि. कीम ४२०, ४६६, ४६७, ४७१, ४७३, ४८१, १८१, ४७४, ४०९, ३४ अन्वये १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी ३ आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर असून अन्य आरोपींना समजपत्र देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या राजावाडी हॉस्पिटलच्या हलगर्जीपणाबाबत

(३५) ३९००८ (२१-०१-२०१६). श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेच्या राजावाडी हॉस्पिटलच्या हलगर्जीपणामुळे २० वर्षीय तरुणाला गँगरीन झाल्याने हाताची पाचही बोटे गमवावी लागली असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील तरुणाला वैद्यकीय निष्काळजीपणामुळे बोटे गमवावी लागली असल्याने त्याने प्रशासनाकडे रु.१० लाख नुकसान भरपाई किंवा नोकरी द्यावी, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) श्री.उमाकांत माने, वय २० वर्षे यांना दि. ०१.१०.२००२ ते २५.१०.२००२ या कालावधीत मुंबई महापालिकेच्या राजावाडी रुग्णालयात ताप, आकडी व आक्रमण वागणे या तक्रारी करीता भरती केले असता त्यावरील उपचारादरम्यान गँगरीन झाल्याने त्यांच्या हाताची पाचही बोटे गमवावी लागली हे खरे आहे.

तथापि, सदर रुग्णालयामध्ये त्यांना योग्य ते उपचार त्वरीत दिले असून त्यामध्ये कोणताही हलगर्जीपणा झालेला नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) श्री.उमाकांत माने यांनी सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर मा.न्यायालयाने दिनांक ०६.०४.२००३ रोजी श्री.माने यांना महापालिका सेवेत चतुर्थश्रेणीत नोकर देण्याचे आदेश दिले.

त्यावर महानगरपालिका प्रशासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष न्यायीक याचिका (SLP) दाखल केली. सदर याचिकेवर, श्री.उमाकांत माने यांनी दाखल केलेल्या याचिकेबद्दल संबंधित पक्षकारांनी मा.उच्च न्यायालयासमोर आपली बाजू मांडण्याचे तसेच मा.उच्च न्यायालय प्रकरणी आधीच्या आदेशाची अंमलबजावणी अथवा सुधरित आदेश जे योग्य वाटेल ते देऊ शकते असे आदेश मा.न्यायालयाने पारीत केले.

सदर आदेशास अनुसरुन महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात नोटीस ऑफ मोशन क्र. ५१३/२००३ दाखल केली.

सदर रिट पिटीशन व नोटी ऑफ मोशनची एकत्रिकरण दिनांक २४.०८.२०१५ रोजी सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांची बाजु ऐकल्यानंतर मा.न्यायालयाने यांनी श्री.माने यांना मानसिक व शारिरीक अपंगत्वामुळे महानगरपालिकेत चतुर्थश्रेणी कामगार म्हणून सेवेत सामावून घेणे संयुक्तीक ठरणार नाही, परंतु नुकसान भरपाई देण्याबाबत विचार करण्यास महानगरपालिकेस अवधी दिला.

सदर प्रकरणी कोणताही हलगर्जीपणा झालेला नसल्यामुळे नुकसान भरपाई देता येणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाचे मत मा.उच्च न्यायालयास कळविले आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदर तरुणास दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर तरुणास रुपये २१ लाख ८२ हजार ५०० इतकी नुकसान भरपाई द्यावी असे आदेश दिले आहेत.

तथापि, सदर प्रकरणी कोणताही हलगर्जीपणा झाला नसल्याचे महानगरपालिकेचे मत असल्यामुळे, सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मा.सर्वोच्च न्यायालयात विशेषन्यायिक याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट असून, याबाबत पुढील आदेश प्राप्त झाल्यावर महापालिकेमार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मुंबई मेट्रोच्या भाडेवाढीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याबाबत

(३६) ४०१९३ (१६-०५-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रोच्या भाडेवाढीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी केंद्रीय नगरविकास मंत्रालयाने या प्रकल्पाला मेट्रो ऐवजी ट्राम-वे या कायद्यात आणण्याचे ठरविले असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील सर्वसामान्य प्रवाशांना मेट्रोच्या भरमसाठ भाडेवाढीपासून कायमस्वरूपी दिलासा मिळण्यासाठी हा प्रकल्प मेट्रो ऐवजी ट्राम-वे या कायद्यात आणण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा प्रकल्प मेट्रो ॲक्टमधून वगळण्याबाबत केंद्रीय शहर विकास मंत्रालय नवी दिल्ली यांना विनंती केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील अल्पवयीन मुलाच्या दुचाकी वाहने चालवत असताना झालेल्या अपघातात वाढ झाले बाबत

(३७) ४१०५९ (२८-०४-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात माहे १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०१५ याकाळात, ४१९ अपघात झाले या पैकी ६८ अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास,प्रादेशिक परिवहन विभागाकडून दुचाकी वाहने चालवण्यासाठी १८ वर्ष खालील मुलांना निर्बंध असताना देखील सरास दुचाकी वाहने चालवत असल्याचे हे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
सन २०१५ मध्ये ४१९ प्राणांतिक अपघातामध्ये १६ अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वाहतूक शाखेकडून जनजागृतीचे कार्यक्रम राबवून विद्यार्थी पालक यांना १८ वर्षाखालील मुलांना दुचाकी चालविण्यात देऊ नये याकरीता प्रबोधन केले जाते. सन २०१५ मध्ये १८ वर्षाखालील दुचाकी चालविणाऱ्या ३४५ मुलांवर कारवाई करुन त्यांच्याकडून रु. १,२१,९००/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच वाहतूक पोलीसांकडून विशेष मोहिमा राबवून कारवाई केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मालाडच्या आप्पा पाडा मधील शौचालय दुरुस्ती व बांधकाम कचरापेटी मलनिस्सारण वाहिनीच्या बांधकाम व दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती,बालवाडी इ. कामांमध्ये अपहार झाल्याबाबत

(३८) ४१७४१ (०४-०३-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाडच्या आप्पा पाडा मधील महाराष्ट्रनगर, पारेखानगर, प्रथमेश नगर या भागात शौचालय दुरुस्ती व बांधकाम कचरापेटी मलनिस्सारण वाहिनीच्या बांधकाम व दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, बालवाडी इ.३१ प्रकारच्या कामांच्या खोट्या निविदा काढून प्रभाग अधिकारी

देवेंद्रकुमार जैन ठेकेदार व इतर सर्व संबंधितांच्या संगनमताने काम न करताच तब्बल १ कोटी २५ लक्ष रुपयांची देयके काढून अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती खोट्या निविदा काढून काम न करताच देयके काढणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर तसेच संगनमत करणाऱ्या ठेकेदार व इतर यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) सदर प्रकरणी विविध कामांमध्ये आढळलेल्या अनियमिततांबाबत एप्रिल, २०१५ मध्ये तक्रार प्राप्त झाली होती.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी सुरु आहे.

(३) प्राथमिक चौकशीमध्ये सकृतदर्शनी दोषी आढळून येणाऱ्या कर्मचाऱ्याविरुध्द महापालिकेमार्फत नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याबाबत

(३९) ४१९२९ (०५-०३-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे दिवसेंदिवस ठाणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनलेली असल्याने ठाणे शहरातील रस्त्यांचे रखडलेले प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तसेच आयुक्त, ठाणे महानगरपालिका याच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ठाणे शहरातील रखडलेल्या रस्त्याचे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

टिकुजिनी वाडी ते हॅप व्हॅली तसेच दिवा स्टेशन ते आगासन या रस्त्याचे प्रकल्प मार्गी लावण्याची मागणी केली आहे.

(२) उक्त रस्त्यांपैकी टिकुजिनी वाडी ते हॅपी व्हॅली या रस्त्याचे काम माहे जानेवारी, २०१६ मध्ये सुरु केले असून मार्च, २०१६ अखरेपर्यंत पूर्ण होईल. तसेच दिवा स्टेशन ते आगासन या कामाचे आराखडे व प्रकल्प तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-पुणे-नाशिकला जोडणाऱ्या ईस्टर्न एक्स्पेस हायवेवरील कोपरी उड्डाणपुलाच्या चार अतिरिक्त लेन वाढविण्याच्या कामास आवश्यक निधी उपलब्ध करुन देऊन सदरचे काम लवकर पुर्ण करण्याबाबत

(४०) ४१९७१ (१९-०३-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे-नाशिकला जोडणाऱ्या ईस्टर्न एक्स्पेस हायवेवरील कोपरी उड्डाणपुलाच्या चार अतिरिक्त लेन वाढविण्याच्या कामास आवश्यक निधी उपलब्ध करुन देऊन सदरचे काम पुर्ण करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आवश्यक निर्णय घेऊन त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर उड्डाणपूलाच्या रुंदीकरणाच्या कामास केव्हा सुरुवात होणार आहे, नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१६) :(१) होय.

(२) सदर प्रकल्पाचे सविस्तर सर्वेक्षण, डिझाइन व अंदाजपत्रक बनविण्याकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियुक्त सल्लागारांस दि. १०.१२.२०१५ रोजी कार्यादेश देऊन कामास सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक २९.०२.२०१६ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झाला असून त्याची पडताळणी त्यांच्या स्तरावर सुरु आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास पावसाळ्यानंतर ऑक्टोबर, २०१६ मध्ये सुरुवात होऊन त्यानंतर ३ वर्षाच्या कालावधीत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत यशवंत चव्हाण स्मृती रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणाबाबत

(४१) ४३६६५ (१३-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये डॉक्टराच्या हलगर्जीपणामुळे दिनांक १६ सप्टेंबर २०१५ रोजी श्री. बाळासाहेब हरिभाऊ देंडगे या रुग्णास एक पाय गमवावा लागला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हेरी कोज व्हेन या आजारासाठी दाखल झालेल्या रुग्णाच्या पायाची शस्त्रक्रीया करताना डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मुख्य रक्तवाहीनी कापली गेल्याने पायास गँगरीन होवून पाय कापवा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णास पिंपरी चिंचवड महापालिकेने नुकसान भरपाई म्हणून अवघे ३ लाख रुपये देण्याचे कबूल केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील संबंधीत दोषी डॉक्टरांवर कारवाई करुन संबंधीत रुग्णास भरघोस मोबदला देणेबाबत शासन स्तरावरुन कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) दिनांक २७.१.२०१६ रोजी श्री.देंडगे यांना अर्थसहाय्य म्हणून ३,००,०००/- रुपये देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. परंतु स्थायी समितीने ठराव क्र. १४८३३, दिनांक २९.१.२०१६ अन्वये सदरचा विषय फेटाळला.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये श्री.देंडगे यांच्यावर केलेल्या शस्त्रक्रियेकरिता आलेला खर्च रक्कम रुपये ४३,०९३/- माफ करण्यात आले आहे.
(४) सदर प्रकरणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दिनांक २२.२.२०१६ अन्वये बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिक्षक यांना समिती स्थापन करुन चौकशी करणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार स्थापन झालेल्या समितीने दिनांक १८.३.२०१६ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार डॉ.मनन सिंग यांना दिनांक ३.१२.२०१५ अन्वये वायसीएम रुग्णालय त्यांची सेवा समाप्त करण्यात आलेली आहे. तसेच डॉ.मनन सिंग यांची महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडे असलेली नोंदणी रद्द करणेकामी शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांचेकडील अहवाल विचारात घेता प्रस्तुतप्रकरणासाठी जबाबदार / दोषी आढळलेल्या डॉ.मनोज देशमुख, वैद्यकीय अधिक्षक, डॉ.राजेश गोरे, भुलतज्ञ डॉ.संजय पाडाळे, सर्जन श्रीमती इड्रीना जॉन, सिस्टर इन्चार्ज, श्रीमती वर्षा राऊत, स्टाफनर्स व श्रीमती जयश्री कुंभार, स्टाफनर्स यांची प्रस्तुत प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कारवाई करणेकामी विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील एमएमआरडीए अंतर्गत दहिसर-अंधेरी मेट्रो मार्ग, बीकेसी-चुनाभट्टी उड्डाणपुल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक आणि मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनचा कुलाबा-वांद्रे-सीप्झ या प्रकल्पांबाबत

(४२) ४४३४७ (०७-०५-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एमएमआरडीए अंतर्गत दहिसर-अंधेरी मेट्रो मार्ग, बीकेसी-चुनाभट्टी उड्डाणपुल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक आणि मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनचा कुलाबा-वांद्रे-सीप्झ या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांना किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच या प्रकल्पाने बाधीतांचे पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) सदर कामासाठी सन २०१६-१७ या अर्थसंकल्पीय वर्षात रु. ५.०० कोटीची तरतूद मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आली असून सदर प्रकल्पाने बाधित प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहत धोरणानुसार करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील टेक्सन कंपनीने सन १९८१ ते २०१५ या काळात कामगारांना रोजगारापासून वंचित ठेवल्याबाबत

(४३) ४४५२५ (०५-०३-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील टेक्सन कंपनीने सन १९८१ ते २०१५ या काळात कामगारांना रोजगारापासून वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्यायग्रस्त कामगारांनी कामगार न्यायालयात धाव घेतली असता कामगारांना कामावर घेण्याचे व मागील पगार देण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत, हे खरे आहेत काय,
(३) सदर प्रकरणी कंपनीचे मालक, व्यवस्थापन यांचेबरोबर माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनस्तरावर बैठक होउन उपरोक्त कंपनीचे कामगारांना न्याय देण्याबाबत धोरण ठरले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१८-०३-२०१६) :(१) कामगारांनी दिनांक ११ मे १९८१ पासून सुरु केलेला संप मागे घेऊन व्यवस्थापनाने त्यांना (निलंबित केलेले कामगार वगळून) कामावर रुजू करुन घ्यावे अशा प्रकारचे आदेश मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दिनांक ११ ऑगस्ट, १९८६ रोजी पारित केलेले होते. या आदेशांविरुध्द कामगार संघटनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ४६३९/१९८६ दाखल केली होती. या याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३.१०.१९८६ रोजी औद्योगिक न्यायालय जो वाढीव कालावधी देईल त्या कालावधीमध्ये कामगारांना हजर करुन घ्यावे असे आदेश दिले. त्यानुसार औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दिनांक ०९.०१.१९८७ रोजी असे आदेश पारित केले की, कामगारांना दिनांक १९.०१.१९८७ पर्यंत व्यवस्थापनाने कामावर रुजू करुन घ्यावे, मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. २५८०/१९८७ मध्ये

दिनांक ०९/०१/१९८७ चे औद्योगिक न्यायालयाचे आदेश दिनांक ०३.१२.१९८७ रोजी रद्दबातल ठरविले तद्नंतर ४.१२.१९८७ रोजी कामावर हजर होण्यासाठी गेले असता हमीपत्र न दिल्यामुळे व्यवस्थापनाने त्यांना कामावर हजर करुन घेतले नाही.

(२) मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी तक्रार युएलपी क्र. ४५९/१९८७ मध्ये दिनांक २८.१०.१९९३रोजी असा निर्णय दिला आहे की, ज्या कामगारांनी दिनांक १२.१०.१९९० रोजीच्या करारानुसार राजीनामा दिला नाही. त्या कामगारांना कामावर घेण्याबाबत व त्यांचे पगार देण्याबाबत आदेशित केले आहे.

(३) मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि. २८/१०/१९९३ च्या अन्वयार्थाबाबत कामगार व व्यवस्थापन यांच्या भूमिका परस्परविरोधी आहेत. कामगारांनी राजीनामा दिला आहे अशी भूमिका घेउुन व्यवस्थापन कामगारांस कामावर रुजू करून घेत नाही, ही व्यवस्थापनाची भूमिका कामगारांना मान्य नसल्याने त्यांनी याबाबत मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे तक्रार क्र. १५१/१९९४ व संकिर्ण तक्रारी क्र.१२/२००० ते ३३/२००० (२२ तक्रारी) दाखल केलेल्या होत्या. सदरहू सर्व तक्रारी मा.औद्योगिक न्यायालयाने दि. १०/२/२००३ च्या आदेशान्वये नामंजूर केल्या मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि. २८/१०/१९९३ च्या आदेशाविरुध्द २२ कामगारांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६४४८/२००३ दाखल केली असून ती सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

दरम्यान कामगारांचे दिनांक ६/७/२०१५ रोजीचे निवेदन कामगार उप आयुक्त, ठाणे कार्यालयास प्राप्त झाले होते. व्यवस्थापन व निवेदनकर्ते कामगार यांना चर्चे करीता कामगार उप आयुक्त, ठाणे कार्यालयात दिनांक ५/८/२०१५ ते दि. २०/१०/२०१५ या कालावधीत चर्चेकरीता वेळो वेळी बोलविण्यात आले होते. तथापि, एक वेळची उपस्थिती वगळता व्यवस्थापनाच्या अनुपस्थितीमुळे चर्चा/समझोता घडून येऊ शकला नाही.

(४) १९८१ साली उद्भवलेल्या विवादामध्ये कामगार/कामगार संघटना व व्यवस्थापनाने न्यायिक प्रक्रियेचा अवलंब केलेला असून त्यामधीलविविध निर्णय व त्यांचे अन्वयार्थ ही बाब हा न्याय प्रक्रियेचाच भाग असल्याने हे प्रकरण सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ आहे.

तथापि, सदर प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही / कारवाई करण्यात आलेली आहे.

१) व्यवस्थापनाचा कामगार कपातीचा अर्ज शासनाने दि.१३/१/१९८७ रोजी नाकारलेला आहे.

२) विवादात मार्ग काढण्यासाठी शासन व कामगार कार्यालयाच्या स्तरावर १९८१ ते १९८५ च्या दरम्यान बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. परंतु त्यामध्ये मार्ग निघून शकला नाही.

३) दि. ५/८/२०१५ ते २०/१०/२०१५ या कालावधीत व्यवस्थापन व तक्रारदार कामगार यांच्या बैठका आयोजित करण्यात आल्या, परंतु केवळ एका वेळची उपस्थिती वगळता व्यवस्थापनाच्या अनुपस्थितीमुळे मार्ग निघू शकला नाही.

४) व्यवस्थापनातर्फे सादर करण्यात आलेल्या दि.२७/३/२०१५ रोजीचा कामगार विभागाने ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचा अर्ज नामंजूर करण्याचे क्षेत्रीय कार्यालयामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

५) क्षेत्रीय कामगार कार्यालयाच्या अंमलबजावणी यंत्रणेमार्फत आस्थानेस किमान वेतन अधिनियम, १९४८ , वेतन प्रदाने अधिनियम, १९३६ बोनस प्रदान अधिनियम, १९६५ उपदान प्रदान अधिनियम, १९७२ प्रसुति लाभ अधिनियम, १९६१ व किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ अंतर्गत निरीक्षण शेरे दिनांक २९/१०/२०१५ रोजी संमत करण्यात आले होते. सदरहू निरीक्षणात आढळून आलेल्या त्रुटींच्या पुर्तता व्यवस्थापनाने न केल्याने किमान वेतन अधिनियम, १९४८, प्रसुत लाभ अधिनियम, १९६१ व किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ अंतर्गत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ठाणे यांचेसमोर खटले दाखल करण्यात आले आहेत. वेतन प्रदान अधिनियम, १९३६, बोनस प्रदान अधिनियम, १९६५ व उपदान प्रदान अधिनियम १९७२ अंतर्गत खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धारावी पुनर्विकासाबाबत

(४४) ४४९३१ (१७-०५-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावीतील झोपडीधारकांना ३५० चौरस फुटांचे घर देण्याचे आणि पुनर्विकासाच्या निविदा काढण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पातील सेक्टर १ ते ४ च्या पुनर्विकासामध्ये किती हजार झोपडपट्टीधारकांना किती स्क्वेअर फुटाचे घर देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, धारावी पुनर्विकासाला धारावीकरांचा विरोध असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास रखडलेला असल्याने शासनाने केलेल्या घोषणेप्रमाणे धारावी पुनर्विकासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२३-०६-२०१६) :(१) दिनांक २४.०९.२०१५ रोजी मा.गृहनिर्माण यांच्या बैठकीत धारावीतील पात्र झोपडीधारकांना ३०० चौ.फुट अधिक फंजीबल चटई क्षेत्र निर्देशकांमधून नीश, प्लॉवर बेड व ऑर्नामेंटल प्रोजेक्शन देण्याचे ठरले व त्यास मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १३.१०.२०१५ रोजी सहमती दिली. तद्नंतर दि. ०६.०१.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सेक्टर क्र. १ ते ४ च्या निविदा दस्ताऐवजांच्या प्रारुप तरतूदीस व निविदा प्रसिध्द करण्यात मंजूरी देण्यात आली

(२) प्राथमिक सर्वेक्षणानुसार धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या सेक्टर क्र. १ ते ४ मधील निवासी / अनिवासी गाळेधारकांची संख्या ४९,७७८ इतकी आहे, असे धारावी पुनर्वसन प्रकल्पाने कळविले आहे.

(३) प्रकल्प क्षेत्रातील इमारती व चाळींमधील काही रहिवाश्यांची अधिक चटई क्षेत्र सदनिकेची तसेच स्वयंविकासाची मागणी आहे.
(४) धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या सेक्टर क्र. १ ते ४ करिता जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यात निविदादारांनी ई-निविदा सादर करावयाची अंतिम तारीख ३० जुलै, २०१६ अशी आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण - अंबरनाथ मुख्य रस्त्यांचे रुंदीकरणाची विकास कामे तातडीने करणेबाबत

(४५) ४६४४९ (१६-०५-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील कल्याण-अंबरनाथ या मुख्य रस्त्यांचे रुंदीकरणाचा विकास कामांना आग्रहाने प्राधान्य देऊन पुरवणी अंदाजपत्रकात समाविष्ट करावा अशा आशयाचे निवेदन मा. लोकप्रतिनिधीनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई ह्यांना दिनांक १८ जानेवारी,२०१६ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास कल्याण-अंबरनाथ रोडमध्ये बाधित असलेले अतिक्रमणे निष्कासित करून जवळपास एक महिन्याच्यावर झाला असूनही रस्त्याचे विकासकाम वेळेवर न झाल्याने व्यापाऱ्यामध्ये तसेच नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर रस्त्याच्या दुर्तफा असलेले गटारे तुंबून वाहत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून वाहनचालकांना त्रास होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याच्या विकासकामे सुरु होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील कल्याण-अंबरनाथ या मुख्य रस्त्याचे अतिक्रमणे निष्कासित भागातील रुंदीकरणाचे कामास सद्य:स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत मंजूरी नाही. प्राधान्य, निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधिकरणामार्फत सदरचे काम हाती घेण्याचे नियोजीत आहे.

नांदेड जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आकारण्यात आलेल्या शुल्काबाबत

(४६) ४६९८२ (१३-०५-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विदयार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी १००० रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दुष्काळ असल्याने कोणतेही शुल्क आकारु नये असे शासनाचे धोरण असतांनाही शुल्काची आकारणी करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी-२०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील शासकीय / अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश प्रक्रियेच्यावेळी प्रशिक्षणार्थीकडून रुपये १०००/- संस्था विकास शुल्क आकारण्यात आले होते. तथापि, यासंदर्भात शासनाने सदर शुल्क परत करण्याचे आदेश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

म्हाडाच्या निधीतून बांधण्यात आलेल्या बालवाडी, योगाकेंद्र व समाजकल्याण केंद्र अनधिकृत संस्थाच्या ताब्यातून सोडविण्याबाबत

(४७) ४७४८४ (१४-०३-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (प) नेहरु नगर येथील अण्णा चाळीमधील बालवाडी, जुहू वर्सोवा लिंक रोड येथील योगा केंद्र, जेव्हीपीडी १३ वा रोडवरील समाजकल्याण केंद्र, वायरलेस रोडवरील बालवाडी म्हाडाच्या निधीतून बांधण्यात आले असल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बालवाडी, योगाकेंद्र, समाजकल्याण केद्र, या जागा अनधिकृत संस्थांनी गिळंकृत केलेल्या आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थांबरोबर म्हाडाचा कुठल्या ही प्रकारचा करार झालेला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१६-०६-२०१६) :(१) म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार अण्णा चाळ, मिठीबाई कॉलेज समोरील, नेहरुनगर येथील समाजकल्याण केंद्र, जुहू वर्सोवा लिंक रोड कपासवाडी येथील योगा केंद्र, जुहू १३ वा रस्ता, लोटस आय रुग्णालय समोरील समाज कल्याण केंद्र या वास्तू मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या आहेत.

तथापि, वायरलेस रोड, जुहू गल्ली, येथील बालवडीचे बांधकाम हे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत करण्यात आलेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर येथे उपमाहिती कार्यालय सुरु करणे बाबत

(४८) ५०११६ (२०-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर जिल्हा लातूरसह देवणी, जळकोट चाकूर, शिरुरानान्त्पाल, अहमदपूर तालुक्यातील दैनिक कार्यक्रम व विकास कामना गती देण्यासाठी स्वतंत्र व स्वयं पूर्ण उपमाहिती कार्यालय सुरु करावे अशी मागणी सप्टेंबर २०१५ च्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,.

(२) असल्यास,या मागणीनुसार शासनाने सदर कार्यालय सुरु करण्यासाठी स्वतंत्र पद्निर्मिती करून सर्व सामुग्रीसह उदगीर येथे उपमाहिती कार्यालय सुरु करणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशक घटस्पोट मिळवून देण्यासाठी महिलांकडून पैशांची मागणी करित असल्याबाबतत

(४९) ५१९९७ (२०-०५-२०१६). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कौटुंबिक न्यायालयातील समुपदेशक महिलांकडून पैशांची मागणी करुन घटस्फोट मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका पिडीत महिलेने याबाबत मा.न्यायालयाकडे तक्रारही केली आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) सदर लेखी तक्रार कौटुंबिक न्यायालय, पुणे यांचेमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आली आहे.

कौटुंबिक न्यायालय, पुणे यांच्या आदेश क्र. आस्था/१०/२०१६, दि. ११.०१.२०१६ अन्वये संबंधित समुपदेशकाकडून समुपदेशनाचे सर्व काम पुढील आदेश होईपर्यत काढून घेण्यात आले आहे. तसेच पुढील आदेश होईपर्यंत त्यांयाकडे कोणतेही समुपदेशनाचे काम वर्ग करण्यात येऊ नये असेही आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेची दिशाभूल करुन मे.मोरेश्वर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांना बेकायदेशिररित्या अदा केल्याबाबत

(५०) ५३२१२ (१४-०३-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने गुरु-त्ता -गददी सोहळयाच्या निमित्याने जेएनएनयुआरएम अंतर्गत मे.मोरेश्वर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांना नांदेड शहरातील रस्त्याची कामे त्यांनी ठरविलेल्या कालावधीत पुर्ण न केल्यामुळे तसेच रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची केली असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार राज्यशासनाने विखंडीत केलेल्या ठरावाच्या कार्यवाहीनुसार तसेच महालेखाकार, नागपूर यांनी नोंदविलेल्या आक्षेपानुसार त्यांच्याकडून वसुलीपात्र रक्कम रु.४.०० कोटी वसुल करावेत असा आदेश प्रशासनास दिला असल्याचे माहे फेब्रुवारी,२०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर वसुली पात्र रक्कम वसूल करण्याऐवजी आयुक्तांनी सर्व साधारण सभेची दिशाभूल करुन बेकायदेशिरपणे मोरेश्वर बिल्डर्स यांना रु.१.०० कोटीचे देयक अदा केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुषंगाने आयुक्त, मनपा, नांदेड यांच्या विरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१), (२) व (३) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा ठराव क्रमांक ४३३ हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा नसल्याने शासनाने दिनांक १४.५.२०१२ च्या आदेशान्वये सदर ठराव विखंडीत केला.

तथापि, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक ३१.०३.२०१५ च्या ठराव क्रमांक २१५ अन्वये विखंडीत केलेल्या कार्यवाहीशी विसंगत असा ठराव केला.

नांदेड वाघाळा महानगरपालिकेची सदरची कार्यवाही महानगरपालिकेच्या आर्थिक हिताची व नियमानुसार नाही.

यासंदर्भात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या कडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला असून, सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.